# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** अमृत योजनेअंतर्गत ४२ उंचीवरील जलकुंभ (ESR) व ०१ जमिनीवरील
**{सार्व.आरो. अभि. विभाग}** जलकुंभ (GSR) अशा एकूण ४३ जलकुंभाचा समावेश असुन ५९.०० कि.मी. मुख्य जलवाहीनी व ३७८.०० कि.मी. आंतरिक वितरण जलवाहीणीचा समावेश आहे. या योजनेचे काम मे. वाप्कोस लि. (भारत सरकारचा उपक्रम) यांना देण्यात आले होते.

यानंतर सदर जलकुंभ बांधण्याकरीता निश्चित केलेल्या जागा विविध प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असल्याने या जागांचा ताबा घेवून मे. वाप्कोस यांना विहीत मुदतीत हस्तांतरीत करण्याकरीता महानगरपालिकेला झालेला विलंब व मे. वाप्कोस यांनी बोलाविलेल्या निविदेस मिळालेला अल्प प्रतिसाद यामुळे फक्त १६ ESR + संबंधीत मुख्य वाहिण्या + ३७७ कि.मी. वितरण वाहीण्या एवढेच काम करणे शक्य असल्याबाबत मे. वाप्कोस यांनी स्विकृती दिल्यामुळे उर्वरित कामे हे म.न.पा.स वेगळया निविदा बोलावून करण्याचे निश्चित करण्यात आले.

अमृत योजनेअंतर्गत झोन क्र.९ येथील प्रस्तावित इंदोरा, नारा आणि नारी-२ या उंच जलकुंभाचे काम मे. वाप्कोस लि. यांना मंजुर डि.पी.आर. नुसार ९.५० कोटी मध्ये करावयाचे होते. परंतु मे. वाप्कोस लि. यांनी सदहू काम करण्यास नकार दिल्यामुळे सदहू कामाचे प्राकलन NMC/PWD C.S.R. २०२०-२१ व म.जी.प्रा. दरसूची २०२१-२२ नुसार रू. १९४५३३७६९/- चे तयार करण्यात आले व निविदा बोलावण्यात आल्यात.

सदहू कामाची तिस-यांदा मागविलेल्या निविदेमधे निम्नतम निविदाकार मे. सेंट्रल इंडिया इंजिनियरींग प्रा. लि. यांची २९.५५ टक्के जास्त दराची व मे. मारोती मांडवे यांची २९.८० टक्के जास्त दराची निविदा प्राप्त झाली. दोन्ही निविदा दरांमधे विशेष फरक नाही. निम्नतम निविदाकार मे. सेन्ट्रल इंडिया इंजीनिअरींग यांना सदहू काम देण्याचे प्रस्तावित होते. परंतु त्यांनी सदहू काम करण्यास नकार दिला. द्वितीय निविदाकार मे. मारोती मांडवे यांनी त्याच निविदा दरावर काम करण्यास स्विकृती दर्शविली आहे.

म.जी.प्रा. दरसुची २०२१-२२ मध्ये पाईप सेक्शन व स्टिलचे दरवाढीमुळे म.जी.प्रा. द्वारा नविन दरवाढीचे शुध्दीपत्रके काढण्यात आलेली आहेत. प्राकलनीय दराची MJP CSR २०२१-२२ शुध्दीपत्रक क्र. ७, ८, ९ व स्टेट PWD CSR २०२१-२२ सोबत तुलना केली असता ३.८८ टक्के अधिकची येते. तसेच बांधकाम साहित्यामधे सतत दरवाढ होत आहे. त्यामुळे सदहू काम मे. मारोती मांडवे यांना २९.५५ टक्के अधिक दरावर देण्याचे प्रस्तावित आहे.

सबब वरिल प्रमाणे खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१. उपरोक्त कामास मनपा ठराव क्र. १४५ , दि. २२.०७.२०२१ अन्वये रु. २५.०५ कोटीच्या खर्चास मंजुरी प्राप्त असल्याने उर्वरीत रु. ३.१७ कोटीच्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

२. या निविदेतील दुसरे निम्नतम निविदाकार मे. मारोती मांडवे हे सदहु काम प्रथम निविदाकार यांचे दरावर म्हणजे २९.५५ टक्के अधिक दरांवर काम करण्यास तयार असल्याने सदहु काम मे.मारोती मांडवे यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

यानुसार या कामावर रु २५,२०,१८,४९८/- + १२% जीएसटी रु ३,०२,४२,२२०/- असे एकुण रु. २८,२२,६०,७१८/- खर्च अपेक्षित आहे.

टिप :- सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ३२/मनपा/प्रशासक** **दिनांक :- ०८/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त

झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार अमृत योजने अंतर्गत ४२ उंचीवरील जलकुंभ (ESR) व ०१ जमिनीवरील जलकुंभ (GSR) अशा एकूण ४३ जलकुंभाचा समावेश असुन ५९.०० कि.मी. मुख्य जलवाहीनी व ३७८.०० कि.मी. आंतरिक वितरण जलवाहीणीचा समावेश आहे. या योजनेचे काम मे. वाप्कोस लि. (भारत सरकारचा उपक्रम) यांना देण्यात आले होते.

यानंतर सदर जलकुंभ बांधण्याकरीता निश्चित केलेल्या जागा विविध प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असल्याने या जागांचा ताबा घेवून मे. वाप्कोस यांना विहीत मुदतीत हस्तांतरीत करण्याकरीता महानगरपालिकेला झालेला विलंब व मे. वाप्कोस यांनी बोलाविलेल्या निविदेस मिळालेला अल्प प्रतिसाद यामुळे फक्त १६ ESR + संबंधीत मुख्य वाहिण्या + ३७७ कि.मी. वितरण वाहीण्या एवढेच काम करणे शक्य असल्याबाबत मे. वाप्कोस यांनी स्विकृती दिल्यामुळे उर्वरित कामे हे म.न.पा.स वेगळया निविदा बोलावून करण्याचे निश्चित करण्यात आले.

अमृत योजनेअंतर्गत झोन क्र.९ येथील प्रस्तावित इंदोरा, नारा आणि नारी-२ या उंच जलकुंभाचे काम मे. वाप्कोस लि. यांना मंजुर डि.पी.आर. नुसार ९.५० कोटी मध्ये करावयाचे होते. परंतु मे. वाप्कोस लि. यांनी सदर्हू काम करण्यास नकार दिल्यामुळे सदर्हू कामाचे प्राकलन NMC/PWD C.S.R. २०२०-२१ व म.जी.प्रा. दरसूची २०२१-२२ नुसार रू. १९४५३३७६९/- चे तयार करण्यात आले व निविदा बोलावण्यात आल्यात.

सदर्हू कामाची तिस-यांदा मागविलेल्या निविदेमधे निम्नतम निविदाकार मे. सेंट्रल इंडिया इंजिनियरींग प्रा. लि. यांची २९.५५ टक्के जास्त दराची व मे. मारोती मांडवे यांची २९.८० टक्के जास्त दराची निविदा प्राप्त झाली. दोन्ही निविदा दरांमधे विशेष फरक नाही. निम्नतम निविदाकार मे. सेन्ट्रल इंडिया इंजीनिअरींग यांना सदर्हू काम देण्याचे प्रस्तावित होते. परंतु त्यांनी सदर्हू काम करण्यास नकार दिला. द्वितीय निविदाकार मे. मारोती मांडवे यांनी त्याच निविदा दरावर काम करण्यास स्विकृती दर्शविली आहे.

म.जी.प्रा. दरसुची २०२१-२२ मध्ये पाईप सेक्शन व स्टिलचे दरवाढीमुळे म.जी.प्रा. द्वारा नविन दरवाढीचे शुध्दीपत्रके काढण्यात आलेली आहेत. प्राकलनीय दराची MJP CSR २०२१-२२ शुध्दीपत्रक क्र. ७, ८, ९ व स्टेट PWD CSR २०२१-२२ सोबत तुलना केली असता ३.८८ टक्के अधिकची येते. तसेच बांधकाम साहित्यामधे सतत दरवाढ होत आहे. त्यामुळे सदर्हू काम मे. मारोती मांडवे यांना २९.५५ टक्के अधिक दरावर देण्याचे प्रस्तावित आहे.

सबब वरिल प्रमाणे खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

१. उपरोक्त कामास मनपा ठराव क्र. १४५ , दि. २२.०७.२०२१ अन्वये रु. २५.०५ कोटीच्या खर्चास मंजुरी प्राप्त असल्याने उर्वरीत रु. ३.१७ कोटीच्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. या निविदेतील दुसरे निम्नतम निविदाकार मे. मारोती मांडवे हे सदर्हु काम प्रथम निविदाकार यांचे दरावर म्हणजे २९.५५ टक्के अधिक दरांवर काम करण्यास तयार असल्याने सदर्हु काम मे.मारोती मांडवे यांना प्रदान करण्यात येत आहे.

यानुसार या कामावर रु २५,२०,१८,४९८/- + १२% जीएसटी रु ३,०२,४२,२२०/- असे एकुण रु. २८,२२,६०,७१८/- खर्च करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**